# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि –४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ (१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११रोजी स्थापित राज्यविद्यापीठ व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम,२०१६ सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ )

**परिक्षा व मुल्यमापण मंडळ (गोपनिय)**

फोन:– ०७१३२.२२३३५०

Email:- gopniyagug@gmail.com

गोवि/प.मु.मं/गोप/जा.क्र./30 /२०२१

दिनांक ०१/०२/२०२१

## परीपत्रक

विषय:– सत्र हिवाळी २०२० च्या विद्यार्थ्याच्या प्रात्यक्षिक परीक्षेबाबत

गोंडवाना विद्यापीठातील संलग्नीत महाविद्यालयातील प्राचार्य, विभागप्रमुख, शिक्षक व संबधीत विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की, गोंडवाना विद्यापीठाच्या शैक्षणिक सत्र २०२०–२०२१ मधील हिवाळी २०२० परीक्षेतील सर्व पदवी/पदव्युत्तर वर्गाच्या विद्यार्थ्यांच्या प्रात्यक्षिक परीक्षा हया दि. १५/०२/२०२१ ते दि. ०५/०३/२०२१ या कालावधीमध्ये Online पध्दतीने घेऊन संबंधीत प्रात्यक्षिक परीक्षेचे गुण त्याच दिवशी विद्यापीठाकडे Online पध्दतीने न चुकता पाठवायचे आहे. विद्यापीठाकडे उशीरा आलेले गुण स्विकारल्या जाणार नाही याची नोंद घेऊन खालील प्रमाणे कार्यवाही घ्यावी.

### शैक्षणिक वर्ष २०२०–२०२१ करीता सर्व पदवी/पदव्युत्तर वर्गाच्या विद्यार्थ्यांच्या प्रात्यक्षिक परीक्षेबाबत मार्गदर्शक सुचना

१ विद्यार्थ्यांच्या सर्व पदवी/पदव्युत्तर प्रात्यक्षिक परीक्षा घरूनच घेतल्या जातील.

२. विद्यार्थ्यांच्या सर्व पदवी/पदव्युत्तर प्रात्यक्षिक परीक्षा Online पध्दतीने घेतल्या जातील.

३. विद्यार्थ्यांच्या सर्व पदवी/पदव्युत्तर प्रात्यक्षिक परीक्षा Google form /email/ Whatsapp किंवा समकक्ष Softwore वापरून Question – Answer द्वारा घेण्यात येईल.

४. Covid – १९ मुळे पदवि/पदव्युत्तर च्या प्रयोगशाळेतील प्रात्यक्षिक परीक्षेसाठी (Laboratory Practical Exam) बाहय परीक्षक ( External Examiner) राहणार नाही.

५. Covid – १९ मुळे पदवि/पदव्युत्तर प्रात्यक्षिकांचे मुल्यमापन अंतर्गत परीक्षका द्वारे करण्यात येईल.
अ) प्रात्यक्षिक परीक्षा यशस्वीरित्या पार पाडण्याची जबाबदारी प्राचार्य यांचेवर राहील.

६. अंतर्गत परीक्षकांची (Internal Examiners) यादी या अगोदर विद्यापीठाने दिलेली नसल्यास प्राचार्यांनी आपले स्तरावर नियुक्ती करून प्रात्यक्षिक परीक्षा पार पाडाव्यात.

७. अंतर्गत परीक्षक हा विद्यापीठातील मान्यता प्राप्त अधिव्याखाता असावा व तो शक्यतोवर महाविद्यालयीन/स्थानीक असावा. मात्र असा अधिव्याखाता स्थानिक स्तरावर उपलब्ध नसल्यास विद्यापीठ मान्यता प्राप्त ( CHB) शिक्षकाची (२०२०–२०२१सत्र) नेमणूक करण्यात यावी.

८. प्रात्यक्षिक परीक्षेचे मुल्यमापना संबंधीत विषयाच्या प्रात्यक्षिक योजने (Scheme) नुसार घेण्यात यावे. ( Prepared by subject Board of Studies )

### विद्यार्थ्यांना विशेष सुचना

विद्यार्थ्यांनी Practical साठी Smartphone / Android Phone / Laptop / Tab Computer चा वापर करावा व त्याप्रमाणे परीक्षा केंद्राला/संबंधीत शिक्षकाला कळविण्यात यावे. आपल्याकडे Android Phone उपलब्ध नसल्यास त्याची व्यवस्था स्वत: करून घ्यावी व गावातील/शहरातील सुरक्षीत स्थळी जेथे इंन्टरनेट उपलब्ध आहे तेथे हजर रहावे. दुसरा कोणताही मार्ग उपलब्ध नसल्यास महाविद्यालय/विभागाशी त्वरीत संपर्क साधावे.

उपरोक्त मार्गदर्शक सुचना नुसार प्रात्यक्षिक परीक्षा घेण्यात याव्यात व तशा सुचना विद्यार्थ्यां करीता मा. प्राचार्यांनी आपल्या स्तरावर निर्गमीत कराव्या.

1/2/2021

(डॉ. अनिल झेड. चिताडे)

संचालक
परीक्षा व मुल्यमापन मंडळ,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली